सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १

# महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम

(दिनांक २६ जून २०१२ पर्यंत सुधारित)

**BOMBAY ACT No. I OF 1959**

# THE MAHARASHTRA INFERIOR VILLAGE WATANS ABOLITION ACT

**(As modified upto the 26 June, 2012 )**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

००००

[किंमत : . रुपये]

वि (जे) ५२२

# सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १

## महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम

## अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | .. | १ |
| २. | व्याख्या. | .. | २ |
| ३. | विवक्षित प्रश्न व अपिले यांचा निर्णय करण्याचे जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार. | .. | ४ |
| ४. | गावची कनिष्ठ वतने व त्यास अनुषंगिक असलेल्या गोष्टी नाहीशा करणे. | .. | ४ |
| ५. | वतन धारण करणाऱ्यास वतन जमीन परत देणे. | .. | ५ |
| ६. | वतन जमीन अधिकृत धारकास परत देणे. | .. | ५ |
| ७. | वारसासंबंधीचा खास नियम निरर्थक असणे. | .. | ७ |
| ८. | कुळवहिवाट कायदा लागू करणे. | .. | ७ |
| ९. | विवक्षित परिस्थितीत अनधिकृत धारकास काढून लावणे व त्यास वतन जमीन परत देणे आणि परत न दिलेल्या जमिनीची विल्हेवाट लावणे. | .. | ७ |
| १०. | वतनदारास द्यावयाची नुकसानभरपाई. | .. | ७ |
| ११. | नुकसानभरपाई देण्याची पद्धत. | .. | ८ |
| १२. | जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याविरुद्ध अपील. | .. | ९ |
| १३. | महसूल न्यायाधिकरणापुढील कार्यरीती. | .. | ९ |
| १४. | मुदत. | .. | ९ |
| १५. | न्यायालय शुल्क. | .. | ९ |
| १६. | निवाडा व महसूल न्यायाधिकरणाचा निर्णय हे अखेरचे असणे. | .. | ९ |
| १७. | चौकशी व कामकाज ही न्यायासंबंधी कामे असणे. | .. | ९ |
| १८. | अधिकार सोपविणे. | .. | ९ |
| १९. | नियम. | .. | ९ |
| २०. | बचाव. | .. | १० |

## सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १[१]

## [महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम]

**[मा. राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २० जानेवारी १९५९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध करण्यात आला.]**

**महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे स्वीकृत व फेरबदल केलेला**

**या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या : —**

**सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ (६-५-२००२) @**

**सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ (९-५-२००८) @**

**सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ (२२-०८-२०१२) @**

## मुंबई राज्याच्या विवक्षित भागात प्रचलित असलेली गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात व मुंबई राज्याच्या हैदराबाद प्रदेशात प्रचलित असलेले मुलकी किंवा पोलीस पाटील किंवा गावचा हिशोबनीस यांच्या दर्जाहून कमी दर्जाचे परंपरागत गावचे हुद्दे व त्यासंबंधीची वतने नाहीशी करणे आणि त्यास परिणामभूत व आनुषंगिक असलेल्या बाबींसाठी तरतूद करणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास [*][महाराष्ट्र गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम] असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, [२][महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशास] व मुंबई राज्याच्या हैदराबाद प्रदेशास लागू आहे.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९५८, भाग चार, पृष्ठे ४२५ -- ४२६ पाहा.

[@] ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे "दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[*] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम ४, याच्या अनुसूचीतील अनुक्रमांक ७३ अन्वये मूळ शीर्षकात सुधारणा करण्यात आली व ती दिनांक १ मे १९६० पासून करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(३) हे कलम ताबडतोब अंमलात येईल.

(४) राज्य शासनास, *राजपत्रात* प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे असे फर्माविण्याचा अधिकार आहे की, या अधिनियमाच्या बाकीच्या तरतुदी अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल [१]अशा स्थानिक प्रदेशात व अशा [१]दिनांकास अंमलात येतील.

**२.** (१) या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर — व्याख्या.

(एक) कोणत्याही स्थानिक प्रदेशाच्या संबंधात "नेमलेला दिनांक" याचा अर्थ, कलम १, पोट-कलम (४) अन्वये अशा स्थानिक प्रदेशात या अधिनियमाच्या बाकीच्या तरतुदी ज्या दिनांकास अंमलात येतील तो दिनांक, असा समजावा;

(दोन) "अधिकृतधारक" याचा अर्थ, विद्यमान वतन कायद्यान्वये वतनदाराने, जी वतन जमीन कायमची वैधरीत्या दुसऱ्याच्या नावे करून दिली असेल — मग ती विक्री करून असो, देणगी म्हणून असो किंवा अन्यथा असो — त्या वतन जमिनीची मालकी जिच्यामध्ये निहित असेल ती व्यक्ती, असा समजावा;

१८७९ चा मुंबई ५. १३१७ चा हैदराबाद अधिनियम ८ फसली.

(तीन) "जमीन महसूल अधिनियम" या संज्ञेचा अर्थ [२][महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशाच्या] संबंधात मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ * आणि मुंबई राज्याच्या हैदराबाद प्रदेशाच्या संबंधात, हैदराबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली, * असा समजावा;

---

१ (क) १ फेब्रुवारी १९५९ रोजी सुरत, नाशिक, दक्षिण सातारा, कोल्हापूर व परभणी या जिल्ह्यांचा समावेश असलेले स्थानिक क्षेत्र (शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक पीकेए-१०५८-नऊ/२०५२/७६-एल, दिनांक २१ जानेवारी १९५९ पाहा.)

(ख) १ ऑगस्ट १९५९ रोजी ब्रोच, कोलबा, पुणे, उत्तर सातारा व औरंगाबाद या जिल्ह्यांचा समावेश असलेले स्थानिक क्षेत्र (शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक पीकेए-१०५९-एक्स/६६६४१-एल, दिनांक १९ मे १९५८ पाहा.)

(ग) १ ऑगस्ट १९६० रोजी सोलापूर, पश्चिम खानदेश, नांदेड, ठाणे व मुंबई उपनगर जिल्हे या जिल्ह्यांचा समावेश असलेले स्थानिक क्षेत्र (शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक बीआयडब्ल्यू-१०६०-चार-एल, दिनांक १९ सप्टेंबर १९६१ पाहा.)

(घ) १ फेब्रुवारी १९६२ रोजी रत्नागिरी, जळगाव, अहमदनगर, भीर, उस्मानाबाद व राजुरा या जिल्ह्यांचा समावेश असलेले स्थानिक क्षेत्र (शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक बीआयडब्ल्यू-१०६१-व्ही-एल, दिनांक १९ सप्टेंबर १९६१ पाहा.)

२ महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे "दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१ पाहा.)

(चार) "जिल्हाधिकारी" या संज्ञेत या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याची कामे पार पाडण्यासाठी व अधिकार चालविण्यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो;

(पाच) "विद्यमान वतन कायदा" या संज्ञेत ज्या स्थानिक प्रदेशात, कलम १, पोट-कलम (४) अन्वये या अधिनियमाचे बाकीचे उपबंध अंमलात येतील त्या स्थानिक प्रदेशात नेमलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वी गावच्या कनिष्ठ वतनाच्या संबंधात अंमलात असेल, असा कोणताही अधिनियम, अध्यादेश, नियम, पोट-कायदा, विनियम, आदेश, अधिसूचना, वटहुकूम किंवा कायद्यासारखा अंमल असलेला इतर कोणताही दस्तऐवज याचा समावेश होतो;

(सहा) "गावचा वंशपरंपरागत कनिष्ठ हुद्दा" याचा अर्थ, गावच्या कारभाराशी किंवा गावचा सार्वजनिक महसूल वसूल करण्याशी किंवा गावच्या पोलिसांशी किंवा सीमा ठरविण्यासंबंधीच्या किंवा गावच्या नागरी कारभारासंबंधीच्या इतर बाबींशी संबंधित असलेली कामे पार पाडण्यासाठी विद्यमान वतन कायद्यान्वये वंशपरंपरागत धारण केलेला, मुलकी किंवा पोलीस पाटील किंवा गावचा हिशोबनीस याच्या दर्जाहून कमी दर्जाचा गावचा प्रत्येक हुद्दा, असा आहे आणि तीत ज्या हुद्द्याच्या संबंधात प्रथमत: त्यासंबंधी असलेल्या चाकऱ्यांची मागणी करण्यात येण्याचे बंद झाले असेल अशा हुद्द्याचा समावेश होतो;

(सात) "गावचे कनिष्ठ वतन" याचा अर्थ, वतन मालमत्ता, कोणतीही असल्यास, तिचा सत्ता प्रकार आणि त्यासोबत असलेले कोणतेही हक्क, विशेषाधिकार व जबाबदाऱ्या यांसह गावचा वंशपरंपरागत कनिष्ठ हुद्दा, असा आहे;

(आठ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले असा आहे;

(नऊ) "कुळवहिवाट कायदा" याचा अर्थ—

(अ) [1][महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशात] *मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ असा समजावा, आणि १९४८ चा मुंबई ६७.

(ब) मुंबई राज्याच्या हैदराबाद प्रदेशात, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५०, असा समजावा; १९५० चा हैदराबाद अधिनियम २१.

(दहा) "अनधिकृतधारक" याचा अर्थ, कोणत्याही हक्कावाचून किंवा विद्यमान वतन कायद्यान्वये रद्द व निरर्थक असलेला कोणताही पट्टा, गहाणखत, विक्री, देणगी किंवा तिने इतर कोणत्याही प्रकारचे अन्यसंक्रमण याअन्वये कोणतीही वतन जमीन कब्जात असलेला इसम, असा आहे;

(अकरा) "वतनदार" याचा अर्थ, विद्यमान वतन कायद्यान्वये गावच्या कनिष्ठ वतनात वंशपरंपरागत हितसंबंध असलेली व्यक्ती, असा समजावा:

---

१ महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे "दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ द्वारे या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात "महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम" अशी सुधारणा करण्यात आली.

परंतु, जेव्हा विद्यमान वतन कायद्यान्वये अशा नोंदणी पुस्तकात किंवा दप्तरात कोणतेही वतन, वतनदाराच्या संपूर्ण वर्गाने धारण केलेले म्हणून दाखल केलेले असेल तेव्हा, असा संपूर्ण वर्ग वतनदार आहे असे समजले पाहिजे;

(बारा) "वतन जमीन" याचा अर्थ, वतन मालमत्तेचा भाग बनणारी जमीन, असा आहे;

(तेरा) "वतन मालमत्ता" याचा अर्थ, गावचा वंशपरंपरागत कनिष्ठ हुद्दा यासंबंधीचे कोणतेही कर्तव्य पार पाडण्यासाठी पारिश्रमिक देण्याची तरतूद करण्याकरिता विद्यमान वतन कायद्यान्वये धारण केलेली, संपादन केलेली किंवा नेमून दिलेली स्थावर किंवा जंगम मालमत्ता, असा आहे व तीत रूढ असलेली फी किंवा पैशाच्या किंवा मालाच्या स्वरूपातील अवांतर आकार विद्यमान वतन कायद्यान्वये वसूल करण्यासंबंधीच्या —मग ते ठरावीक वेळी असो किंवा अन्यथा असो— हक्काचा समावेश होतो. तसेच तीत, मूळच्या वतन मालमत्तेव्यतिरिक्त राज्य शासनाने स्वेच्छेने व मुदती-मुदतीने, फेरफारास किंवा परत घेतल्या जाण्यास अधीन राहून दिलेल्या रोख रकमांचाही समावेश होतो.

(२) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले इतर शब्द व शब्दप्रयोग यांचे, जमीन महसूल अधिनियम यात जे अर्थ दिलेले आहेत तेच अर्थ असतील.

(३) वतनास आनुषंगिक असलेल्या गोष्टींसंबंधीचे या अधिनियमातील उल्लेख हे, या अधिनियमावरून वतने नाहीशी करण्यात आली असली तरी, नेमलेल्या तारखेच्या लगतपूर्वी अंमलात असल्याप्रमाणेच्या त्या गोष्टीसंबंधीचे उल्लेख आहेत असा त्यांचा अर्थ लावला पाहिजे.

विवक्षित प्रश्न व अपिले यांचा निर्णय करण्याचे जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार.

३. (१) जर, —

(अ) कोणतीही जमीन ही वतन जमीन आहे किंवा कसे,

(ब) कोणतीही व्यक्ती ही वतनदार आहे किंवा कसे,

(क) कोणतीही व्यक्ती ही अनधिकृतधारक आहे किंवा कसे,

यासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाला तर, जिल्हाधिकाऱ्यानी, ज्याच्या हितसंबंधास बाध येत असेल अशा पक्षकारास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर व चौकशी केल्यानंतर उक्त प्रश्नाचा निर्णय केला पाहिजे.

(२) अशा निर्णयामुळे नुकसानी पोहोचलेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा निर्णयाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करता येईल.

(३) जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय, पोट-कलम (२) अन्वये अपील केले जाण्यास आणि पोट-कलम (२) अन्वयेच्या अपिलांतील राज्य शासनाचा निर्णय अखेरचा असेल.

गावची कनिष्ठ वतने व त्यास आनुषंगिक असलेल्या गोष्टी नाहीशा करणे.

**४.** कोणतीही वहिवाट, रूढी, तडजोड, अधिकारपत्र, कबुलायत, सनद यात किंवा एखाद्या न्यायालयाचा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश यांत किंवा विद्यमान वतन कायद्यात काहीही असले तरी, नेमलेल्या दिनांकास व त्या दिनांकापासून,—

(१) गावची सर्व कनिष्ठ वतने नाहीशी करण्यात आली पाहिजेत व ती याद्वारे नाहीशी करण्यात येत आहेत,

(२) उक्त वतनासंबंधी अनुषंगिक असलेल्या सर्व गोष्टी (यात हुद्दा व वतन मालमत्ता धारण करण्याचा हक्क, रूढ असलेल्या फी किंवा पैशाच्या किंवा मालाच्या स्वरूपातील अवांतर आकार वसूल करण्याचा हक्क आणि चाकरी करण्याची जबाबदारी या गोष्टींचा समावेश होतो) नष्ट करण्यात आल्या पाहिजेत व त्या याद्वारे नष्ट करण्यात येत आहेत,

(३) कलमे ५, ६ व ९ यांच्या उपबंधांस अधीन राहून, सर्व वतन जमीन परत घेण्यात आली पाहिजे व ती याद्वारे परत घेण्यात येत आहे व जणू ती दुमाला जमीन नव्हती असे समजून, जमीन महसूल अधिनियम व त्याअन्वये केलेले नियम यांच्या उपबंधांन्वये जमीन महसूल देण्यास पात्र असेल :

परंतु, जमीन अशा रीतीने परत घेण्यामुळे, विद्यमान वतन कायद्याच्या उपबंधांनुसार केलेल्या, अशा वतन जमिनीच्या अन्य संक्रमणाच्या वैधतेस किंवा ज्याच्या नावे ती केली असेल त्या व्यक्तीच्या किंवा त्याच्या नावे किंवा त्याच्यावतीने दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तींच्या हक्कांस बाध येणार नाही.

वतन धारण करणाऱ्यास वतन जमीन परत देणे.

**५.** (१) कलम ४ अन्वये परत घेतलेली वतन जमीन ही, कलमे ६ व ९ यांखाली न येणाऱ्या बाबींमध्ये, ज्या वतनासंबंधी ती जमीन होती त्या वतनाच्या वतनदारास, वतनदाराने किंवा त्याच्यावतीने राज्य शासनाला विहित केलेल्या मुदतीत व विहित केलेल्या रीतीने अशा जमिनीच्या संपूर्ण आकारणीच्या रकमेच्या तीन पटीइतके भोगाधिकारमूल्य दिल्यावर परत दिली पाहिजे आणि वतनदार हा, अशा जमिनीच्या संबंधात जमीन महसूल अधिनियमाच्या अर्थानुसार भोगवटा करणार आहे असे समजले पाहिजे आणि तो, जमीन महसूल अधिनियम व त्याअन्वये केलेले नियम यांच्या उपबंधांनुसार राज्य शासनाला जमीन महसूल देण्यास प्रथमतः पात्र असेल; बिन-दुमाला जमिनीसंबंधीचे जमीन महसूल अधिनियमाचे सर्व उपबंध व नियम हे, या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, उक्त जमिनीस लागू होतील:

परंतु, विद्यमान वतन कायद्यान्वये जी वतन जमीन गावच्या वंशपरंपरागत कनिष्ठ हुद्द्याचे पारिश्रमिक म्हणून नेमून देण्यात आली नव्हती त्या वतन जमिनीच्या संबंधात, अशी जमीन परत दिल्याबद्दल वतनदाराने किंवा वतनदाराच्या वतीने अशा जमिनींच्या संपूर्ण आकारणीच्या रकमेइतके भोगाधिकारमूल्य दिले पाहिजे.

(२) जर विहित केलेल्या मुदतीत व विहित केलेल्या रीतीने पोट-कलम (१) अन्वये भोगाधिकारमूल्य देण्यात कसूर झाली तर वतनदार हा, उक्त जमिनीचा अनधिकृतपणे भोगवटा करीत आहे असे समजले पाहिजे व तो, जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधानुसार जिल्हाधिकाऱ्याकडून संक्षिप्त रीतीने चौकशी करून त्यातून काढून लावले जाण्यास पात्र असेल.

[१][(३) [२][(अ)] मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २००० याच्या प्रारंभाच्या दिनांकास (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश "प्रारंभाचा दिनांक" असा केला आहे) किंवा त्यानंतर पोट-कलम (१) अन्वये परत देण्यात आलेल्या जमिनीचा भोगवटा भोगवटादाराला कृषीसंबंधी प्रयोजनासाठी हस्तांतरित करता येईल आणि अशा हस्तांतरणासाठी जिल्हाधिकारी किंवा

२००२ चा महा. २१.

१ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६ द्वारे पोट-कलम (३) ऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

२ सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६ द्वारे पोट-कलम (३) याला खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

कोणताही इतर प्राधिकारी याच्याकडून कोणतीही पूर्वमंजुरी किंवा कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असणार नाही. अशा हस्तांतरणानंतर अशी जमीन संहितेच्या तरतुदींनुसार अशा हस्तांतरिती भोगवटादाराकडून नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण करणे चालू ठेवण्यात येईल:

[1][(ब) प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, भोगवटादाराने जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय किंवा ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय अशा कोणत्याही भोगवट्याचे कृषीसंबंधी प्रयोजनासाठी आधीच हस्तांतरण केले असेल तर, अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून त्याचे विक्री खत, बक्षीसपत्र, इत्यादींसारखे नोंदणीकृत संलेख सादर केल्यानंतर असे हस्तांतरण नियमित करता येईल. असे हस्तांतरण नियमित करण्यात आल्यानंतर, अशा जमिनीचा भोगवटा, संहितेच्या तरतुदींनुसार अशा हस्तांतरिती भोगवटादाराकडून नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण करण्यात येईल:"]

परंतु असे की, नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण केलेला असा कोणताही भोगवटा, प्रारंभाच्या दिनांकानंतर अशा जमिनीच्या चालू बाजारमूल्याच्या पन्नास टक्के रक्कम शासनाला प्रदान करून भोगवटादाराला जुन्या शर्तीमध्ये (भोगवटादार वर्ग एक) रूपांतरित करता येईल, आणि अशा रूपांतरानंतर संहितेच्या तरतुदींनुसार अशी जमीन, भोगवटादार वर्ग एक म्हणून भोगवटादाराकडून धारण करण्यात येईल:

परंतु आणखी असे की, प्रारंभाच्या दिनांकाला, असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने, *नजराणा* म्हणून योग्य ती रक्कम प्रदान करून कृषीतर उपयोगासाठी आधीच हस्तांतरित करण्यात आलेला असेल तर, भोगवट्याचे असे हस्तांतरण पहिल्या परंतुकाअन्वये करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि ती जमीन, अशा हस्तांतरणाच्या दिनांकापासून संहितेच्या तरतुदींनुसार भोगवटादार वर्ग एक म्हणून भोगवटादाराकडून धारण करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

परंतु तसेच, प्रारंभाच्या दिनांकाला असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही इतर सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय आणि अशा जमिनीच्या चालू बाजारमूल्याच्या पन्नास टक्के एवढी रक्कम *नजराणा* म्हणून प्रदान करण्यात आल्याशिवाय कृषीतर उपयोगासाठी आधीच हस्तांतरित करण्यात आला असेल तर, कृषीतर उपयोगासाठी अशा जमिनीच्या चालू बाजारमूल्याच्या पन्नास टक्के एवढी रक्कम *नजराणा* म्हणून आणि अशा *नजराण्याच्या* पन्नास टक्के एवढी रक्कम दंड म्हणून प्रदान करण्यात आल्यावर असे हस्तांतरण नियमित करता येईल आणि असे प्रदान करण्यात आल्यावर, भोगवटादार संहितेच्या तरतुदींनुसार भोगवटादार वर्ग एक म्हणून ती जमीन धारण करील.

(४) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, पोट-कलम (१) अन्वये परत देण्यात आलेल्या *महार वतन* जमिनीचा भोगवटा जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय आणि राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्धारित करील अशी रक्कम प्रदान केल्याशिवाय हस्तांतरित करता येणार नाही किंवा अंतर व सीमा याद्वारे त्याची विभागणी करता येणार नाही.]

---

१ वरील अधिनियमाद्वारे खंड (ब) समाविष्ट करण्यात आला.

६. जेव्हा कलम ४ अन्वये परत घेतलेली कोणतीही वतन जमीन एखाद्या अधिकृत धारकाने धारण केली असेल तेव्हा, त्याने राज्य शासनाला कलम ५ मध्ये निर्दिष्ट केलेले भोगाधिकारमूल्य दिल्यावर व तत्सम शर्तीस व परिणामास अधीन राहून, अधिकृत धारकास परत दिली पाहिजे. अधिकृत धारकास या कलमान्वये जमीन परत देण्याच्या संबंधात, जणू तो वतनदार होता असे समजून, कलम ५ चे सर्व उपबंध, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील. वतन जमीन अधिकृत धारकास परत देणे.

वारसा-संबंधीचा खास नियम निरर्थक असणे. ७. गावच्या कोणत्याही कनिष्ठ वतनावरील वारसासंबंधी ज्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधांमुळे, वहिवाटीमुळे किंवा रिवाजामुळे पक्षकारास लागू असलेल्या व्यक्तिगत कायद्याच्या विरुद्ध ज्येष्ठ वारसा हक्काचा नियम अनुसरण्यात आला असेल आणि स्त्री वारसांना पुरुष वारसांपेक्षा कमी लेखण्यात आले असेल, ती कायद्याची तरतूद, ती वहिवाट किंवा तो रिवाज, नेमलेल्या दिनांकास व त्या दिनांकापासून निरर्थक होईल व अंमलात असण्याचे बंद होईल.

कुळवहिवाट कायदा लागू करणे. ८. जर कोणतीही वतन जमीन वैधरीत्या पट्ट्याने दिली असेल आणि असा पट्टा नेमलेल्या दिनांकास अस्तित्वात असेल तर, कुळवहिवाट कायद्याचे उपबंध, उक्त पट्ट्यास आणि अशी जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीचे हक्क व जबाबदाऱ्या यांस लागू होतील व त्याचे कूळ किंवा कुळे यांस, या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, उक्त कायद्याचे उपबंध लागू होतील.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या कारणाकरिता "जमीन" या शब्दप्रयोगाचा, त्यास कुळवहिवाट कायद्यांत जो अर्थ दिलेला असेल तोच अर्थ असेल.

विवक्षित परिस्थितीत अनधिकृत धारकास काढून लावणे व त्यास वतन जमीन परत देणे आणि परत न दिलेल्या जमिनीची विल्हेवाट लावणे. ९. (१) जेव्हा, कलम ४ अन्वये परत घेतलेली कोणतीही वतन जमीन अनधिकृत धारकाच्या कब्जात असेल तेव्हा, जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधानुसार जिल्हाधिकाऱ्याने, संक्षिप्त रीतीने चौकशी करून अशा अनधिकृत धारकास त्या जमिनीतून काढून लावले पाहिजे :

परंतु, जेव्हा कोणत्याही अनधिकृत धारकाच्या बाबतीत, उक्त जमिनीचा विकास करण्याच्या कामी किंवा उक्त जमिनीचा अकृषिक कारणांसाठी उपयोग करण्याच्या कामी किंवा इतर रीतीने, अशा धारकाने गुंतविलेली रक्कम लक्षात घेता, अशा धारकास उक्त जमिनीमधून काढून लावल्यास त्यास विनाकारण त्रास सहन करावा लागेल असे राज्य शासनाचे मत असेल तर, अशा धारकाने राज्य शासन ठरवील अशी रक्कम दिल्यावर व अशा अटींस व शर्तीस अधीन राहून, त्यास उक्त जमीन परत देण्याविषयी जिल्हाधिकाऱ्यास निदेश देण्याचा राज्य शासनाला अधिकार आहे आणि त्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्याने अशा धारकास उक्त जमीन परत दिली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये जी वतन जमीन परत दिली नसेल त्या वतन जमिनीची, भोगवट्यात नसलेल्या बिन-दुमाला जमिनीची विल्हेवाट लावण्यास लागू होण्याजोग्या जमीन महसूल अधिनियमाच्या व त्यान्वये केलेल्या नियमांच्या उपबंधांनुसार विल्हेवाट लावली पाहिजे.

वतनदारास द्यावयाची नुकसान-भरपाई. **१०.** वतनदारास, वतनावरील त्याचे सर्व हक्क नाहीसे केल्याबद्दल, पुढील खंड (क), (ख) व (ग) यात तरतूद केलेल्या रीतीने हिशोब करून काढलेल्या रकमांच्या एकूण रकमेइतकी नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असेल :—

(अ) वतन जमिनीच्या आकारणीचा संपूर्ण किंवा काही भाग वतनदाराच्या उपलब्धीकडे नेमून दिला असेल त्याबाबतीत, अशा आकारणीच्या संपूर्ण किंवा काही भागाची रक्कम व वतनदाराने राज्य शासनाला द्यावयाची कोणतीही जुडी असल्यास, तिची रक्कम यातील तफावतीइतक्या रकमेच्या सातपट रक्कम;

(ब) विद्यमान वतन कायद्यान्वये राज्य शासनाने वतनदाराला दिलेल्या [मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १८७४ याचे कलम १२, खंड (ख) अन्वये किंवा कोणत्याही विद्यमान वतन कायद्याच्या तत्सम उपबंधान्वये परत घेतलेल्या जमिनीचा खंड नव्हे] वार्षिक नक्त नेमणुकीइतक्या किंवा दरसाल द्यावयाच्या इतर रकमेच्या सातपट रक्कम; १८७४ चा मुंबई ३.

(क) नेमलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या तीन वर्षात, वतनदाराने विद्यमान वतन कायद्यान्वये वसूल केलेल्या किंवा वसूल करण्याजोग्या रूढ असलेल्या फीच्या किंवा पैशाच्या किंवा मालाच्या स्वरूपातील अवांतर आकाराच्या सरासरी रोकड किमतीच्या तीन पट रक्कम, अशी रोकड किंमत विहित केलेल्या रीतीने ठरविण्यात आली पाहिजे.

नुकसान-भरपाई देण्याची पद्धत.

**११.** (१) जर कोणत्याही वतनदारास कलम १० अन्वये नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असेल आणि कोणत्याही इतर व्यक्तीचे, मालमत्तेवरील त्याच्या हक्कांपैकी कोणतेही हक्क किंवा त्यातील हितसंबंध नाहीसे करणाऱ्या, नष्ट करणाऱ्या किंवा त्यात बदल करणाऱ्या या अधिनियमाच्या उपबंधांमुळे नुकसान झाले असेल आणि जर अशा रीतीने हक्क किंवा हितसंबंध नाहीसे केल्याबद्दल, नष्ट केल्याबद्दल किंवा त्यात बदल केल्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची या अधिनियमाच्या उपबंधात तरतूद करण्यात आली नसेल तर, अशा वतनदारास किंवा व्यक्तीस नुकसानभरपाई मिळण्यासाठी विहित केलेल्या नमुन्यात व विहित केलेल्या मुदतीत जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे.

१८९४ चा १ (२) जिल्हाधिकाऱ्याने जमीन महसूल अधिनियमान्वये तरतूद केलेल्या रीतीने रीतसर चौकशी केल्यानंतर, भूसंपादन अधिनियम, १८९४ याचे कलम २३, पोट-कलम (१) व कलम २४ यात तरतूद केलेल्या रीतीने व पद्धतीनुसार नुकसानभरपाई ठरविणारा निवाडा दिला पाहिजे.

(३) (एक) जेव्हा पोट-कलम (२) अन्वये निवाडा देणारा अधिकारी हा, या अधिनियमान्वये जिल्हाधिकारी असेल परंतु, जमीन महसूल अधिनियमान्वये नेमलेला जिल्हाधिकारी नसेल आणि अशा निवाड्याची रक्कम पाच हजार रुपयांपेक्षा अधिक असेल तेव्हा, जमीन महसूल अधिनियमान्वये नेमलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वअनुमतीवाचून असा निवाडा देता कामा नये.

१८९४ चा १ (दोन) पोट-कलम (२) अन्वयेचा प्रत्येक निवाडा हा, भूसंपादन अधिनियम, १८९४ याच्या कलम २६ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात असला पाहिजे.

(४) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे ज्या कोणत्याही वतन जमिनीस जमीन महसूल सर्वस्वी किंवा अंशत: माफ करण्यात आला होता ती जमीन, जमीन महसूल, अधिनियमाच्या उपबंधांनुसार संपूर्ण आकारणी देण्यास या अधिनियमाच्या उपबंधांन्वये पात्र ठरविण्यात आली आहे या मुद्द्यावर कोणत्याही व्यक्तीस नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

१९५८ चा मुंबई ३१. **१२.** जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याविरुद्ध, मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ *याअन्वये रचना केलेल्या मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे उक्त अधिनियमात काहीही असले तरी अपील करता येईल. जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याविरुद्ध अपील.

महसूल न्यायाधिकरणापुढील कार्यरीती. **१३.** (१) [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने,] अपील करणाऱ्यास व राज्य शासनास नोटीस दिल्यानंतर, अपिलाचा निर्णय केला पाहिजे व आपल्या निर्णयाची नोंद केली पाहिजे.

(२) या अधिनियमान्वये केलेल्या अपिलाचा निर्णय करताना [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने,] व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये प्रारंभिक न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर केलेला अपिलांचा निर्णय करताना न्यायालय जे जे अधिकार चालविते ते सर्व अधिकार चालविले पाहिजेत व न्यायालय जी कार्यरीती अनुसरते तीच कार्यरीती अनुसरली पाहिजे. १९०८ चा ५

मुदत. **१४.** या अधिनियमान्वये [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] केलेले प्रत्येक अपील, जिल्हाधिकाऱ्यांच्या निवाड्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या मुदतीत दाखल केले पाहिजे. भारताचा मुदतीविषयी अधिनियम, १९०८ £ याची कलमे ४, ५, १२ व १४ यांच्या तरतुदी असे अपील दाखल करण्यास लागू होतील. १९०८ चा ९

न्यायालय शुल्क. **१५.** [२][मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९], यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] केलेल्या प्रत्येक अपिलावर, विहित करण्यात येईल अशा किमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावलेला असला पाहिजे. १९५९ चा मुंबई २६.

निवाडा व महसूल न्यायाधिकरणाचा निर्णय हे अखेरचे असणे. **१६.** [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] अपील केले जाण्यास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याने दिलेला निवाडा व [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने] अपिलावर दिलेला निर्णय हे अखेरचे व निर्णायक असतील व त्यास कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही दाव्यात किंवा कामकाजात हरकत घेता कामा नये.

चौकशी व कामकाज ही न्यायासंबंधी कामे असणे. **१७.** या अधिनियमान्वये जिल्हाधिकारी व [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण] यांच्यापुढे चालविलेली सर्व चौकशीची व इतर कामे ही, भारतीय दंड संहिता, हिची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायासंबंधी कामे आहेत असे समजण्यात आले पाहिजे. १८६० चा ४५.

अधिकार सोपविणे. **१८.** राज्य शासनास, ते लादील अशा निर्बंधास व शर्तीस अधीन राहून, राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, जिल्हाधिकाऱ्यांच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या आपल्या अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्याकडे या अधिनियमावरून त्यास मिळालेल्या अधिकारांपैकी सर्व किंवा कोणतेही अधिकार सोपविता येतील.

नियम. **१९.** राज्य शासन, पूर्वप्रसिद्धीच्या अटीच्या अधीन राहून या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनाकरिता नियम करू शकेल. असे नियम ते कायम करण्यात आल्यावर राजपत्रात प्रसिद्ध केले पाहिजेत.

---

* महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (सन १९६६ चा महा. ४१ पाहा.)

१ महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे "मुंबई महसूल न्यायाधिकरण" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ वरील आदेशाद्वारे "न्यायालय शुल्क अधिनियम, १८७० किंवा हैदराबाद न्यायालय शुल्क अधिनियम, १३२४ फसली" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

£ आता पाहा मुदतीविषयी अधिनियम, १९६३.

**२०.** या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, — बचाव.

(१) नेमलेल्या तारखेपूर्वी गावच्या कनिष्ठ वतनास आनुषंगिक असलेल्या गोष्टीअन्वये अगोदरच प्राप्त झालेले कोणतेही बंधन किंवा जबाबदारी यास बाध येणार नाही, किंवा

(२) अशा बंधनाच्या किंवा जबाबदारीच्या संबंधातील कोणत्याही कामकाजास किंवा उपाययोजनेस बाध येणार नाही,

आणि जणू हा अधिनियम संमत झाला नव्हता असे समजून, असे कोणतेही कामकाज चालू ठेवता येईल किंवा अशी कोणतीही उपाययोजना अंमलात आणता येईल.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६